02462-653046

# अल्पसंख्याकांच्या कल्याणासाठीच्या विविध योजना.

## अनुक्रमणिका.


| अ.क्र. | योजना | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|
| | **भाग - १**<br>**महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक योजना** | |
| १ | राज्यातील वरिष्ठ प्राथमिक शाळांमध्ये (इयत्ता ५वी ते ७वी) शिक्षण घेत असणा-या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शाळेतील उपस्थितीकरिता त्यांच्या पालकांना प्रोत्साहन भत्ता योजना. | १ |
| २ | राज्यातील अल्पसंख्याक समाजातील प्राथमिक शाळेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांना मोफत गणवेश वाटप योजना. | ३ |
| ३ | अल्पसंख्याक बहुल शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना. | ५ |
| ४ | महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याकांकडून चालविण्यात येणाऱ्या शैक्षणिक संस्थांना धार्मिक/भाषिक अल्पसंख्याक संस्था म्हणून दर्जाची मान्यता देण्याची योजना. | १९ |
| ५ | मराठी भाषा फौंडेशन वर्ग योजना. | २८ |
| ६ | उच्च व्यावसायिक शिक्षण घेणा-या राज्यातील अल्पसंख्याँक विद्यार्थ्यांकरिता शिष्यवृत्ती योजना. | २९ |
| | **भाग - २**<br>**महाराष्ट्र शासनाच्या रोजगार विषयक व विकास योजना** | |
| ७ | राज्यातील अल्पसंख्याक उमेदवारांकरिता रोजगाराभिमुख कार्यक्रम योजना. | ३७ |
| ८ | अल्पसंख्याक समाजातील उमेदवारांसाठी सुधारित पोलीस शिपाई भरती पूर्व परिक्षा प्रशिक्षण वर्ग योजना. | ४१ |
| ९ | मौलाना आझाद अल्पसंख्याक आर्थिक विकास महामंडळाच्या कर्ज योजना. | ४४ |
| १० | अल्पसंख्याक बहुल क्षेत्रात क्षेत्रविकास कार्यक्रम राबविण्यासाठी अनुदान योजना. | ४६ |
| ११ | राज्यातील अल्पसंख्याकांच्या समस्यांबाबत संशोधन,अल्पसंख्याकांशी निगडीत बाबी हाताळणा-या राज्य प्रशासनातील अधिकारी/कर्मचारी यांना प्रशिक्षण व अल्पसंख्याकांसाठीच्या योजनांना प्रसिध्दी याकरिता योजना. | ४९ |
| १२ | राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी तंत्रनिकेतन संस्था स्थापन करण्यासाठी अनुदान योजना. | ५० |
| १३ | राज्यातील अल्पसंख्याक बहुल क्षेत्रांत अल्पसंख्याक विद्यार्थ्यांसाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्रे स्थापन करण्यासाठी अनुदान योजना. | ५५ |
| | **भाग - ३**<br>**भारत सरकारच्या योजना** | |
| १४ | मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ति योजना. | ५९ |
| १५ | मॅट्रिकोत्तर शिष्यवृत्ति योजना. | ६७ |
| १६ | गुणवत्ता-नि-साधन आधारित शिष्यवृत्ती योजना. | ७६ |
| १७ | मोफत प्रशिक्षण तथा संबंध्द योजना. | ८६ |
| १८ | मदरसांमधून गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी योजना. | ८९ |
| १९ | अल्पसंख्याक समाजाच्या संस्था/शाळांसाठी पायाभुत विकास योजना. | १०७ |
| २० | अल्पसंख्याक बहुल जिल्हे विकास योजना. | ११५ |
| २१ | मौलाना आझाद एज्युकेशन फौंडेशनच्या योजना. | |
| | (अ) गुणवत्ताधारक अल्पसंख्याक मुलींसाठी मौलाना आझाद राष्ट्रीय शिष्यवृत्ती योजना. | ११७ |
| | (ब) शैक्षणिक संस्थांमध्ये पायाभूत सुविधा विकसित करण्यासाठी अनुदान योजना. | १२४ |

# भाग - १

## महाराष्ट्र शासनाच्या शैक्षणिक योजना.

# योजना क्र. १

## राज्यातील वरिष्ठ प्राथमिक शाळांमध्ये (इयत्ता ५ वी ते ७वी) शिक्षण घेत असणाऱ्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांच्या शाळेतील उपस्थितीकरिता त्यांच्या पालकांना प्रोत्साहन भत्ता देण्याची योजना.

---

### उद्देश

महाराष्ट्र राज्यातील शासन मान्यता प्राप्त वरिष्ठ प्राथमिक शाळांमध्ये शिक्षण घेणा-या अल्पसंख्याक समाजातील **(मुस्लिम, बौध्द, शीख, ख्रिश्चन, जैन व पारसी)** विद्यार्थ्यांचे शाळा गळतीचे प्रमाण कमी करुन त्यांना शिक्षण घेण्यास प्रेरित करण्यासाठी राज्यातील सर्व शासनमान्य शासकीय तसेच खाजगी अनुदानित व विनाअनुदानित (इंग्रजी माध्यमाच्या कायम विना अनुदानित शाळा वगळून) शाळांमध्ये इयत्ता ५वी ते ७ वी मध्ये शिकणा-या **व शाळेत नियमित उपस्थित सहणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रति दिवस रु.२/- (रुपये दोन मात्र) एवढा प्रोत्साहन भत्ता (उपस्थिती भत्ता) देण्याची योजना राज्य सरकाने सुरु केली आहे.**

### योजनेचे स्वरुप, कार्यक्षेत्र व पात्र अर्जदार

ही योजना राज्यामधील सर्व जिल्हयांमध्ये दि.१३ जून ते दि.३१ मार्च या कालावधीसाठी लागू राहणार आहे. या कालावधीमध्ये इयत्ता ५ वी ते ४ थी मध्ये शिकणा-या व शाळेत नियमित उपस्थित राहणा-या विद्यार्थ्यांच्या पालकांना रु.२/- प्रति दिन एवढा प्रोत्साहन भत्ता देण्यात येईल. हा प्रोत्साहन भत्ता २२० दिवसांसाठी देय असेल. प्रोत्साहन भत्याची रक्कम अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या माहे सप्टेंबर, डिसेंबर व मार्च अशा तीन टप्प्यांमध्ये देण्यात येणार आहे. प्रत्येक टप्प्यात प्रोत्साहन भत्ता मिळण्यास पात्र ठरण्यासाठी संबंधित विद्यार्थ्याची शाळेतील उपस्थिती एकूण शैक्षणिक दिवसांच्या किमान ७५% इतकी असणे आवश्यक आहे.

राज्य शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग किंवा अन्य विभागांमार्फत राबविण्यात येत असलेल्या तसेच केंद्र शासनाच्या या स्वरुपाच्या विद्यमान योजनांच्या माध्यमातून अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या पालकांना प्रोत्साहन (उपस्थिती) भत्ता मिळत असल्यास अशा विद्यार्थ्यांना या योजनेतून दुहेरी लाभ अनुज्ञेय असणार नाही. मात्र अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या पालकांना इतर प्रचलित योजनांमधून मिळत असलेली प्रोत्साहन भत्याची रक्कम या योजनेतून अनुज्ञेय असणा-या प्रोत्साहन भत्यापेक्षा कमी असल्यास त्यांना यामधील फरकाची रक्कम देय राहील.

### योजनेची अंमलबजावणी

या योजनेच्या अंमलबजावणीची जबाबदारी शिक्षण संचालक, (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. योजनेअंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची माहिती संबंधित शाळांचे मुख्याध्यापक संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांचेकडे सादर करतील. शिक्षणाधिकारी (प्राथमिक) हे शाळांना अनुदान वितरित करतील.शाळांचे मुख्याध्यापक विद्यार्थ्यांना प्रोत्साहन भत्ता वितरित करतील.

## योजनेची अधिक माहिती

योजनेची अधिक माहिती संबंधित शाळांचे मुख्याध्यापक अथवा गट शिक्षणाधिकारी (पंचायत समिती), शिक्षण निरिक्षक महानगरपालिका / उप शिक्षणाधिकारी नगरपालिका, शिक्षणाधिकारी, (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच महाराष्ट्र शासन अल्पसंख्याक विकास विभागाच्या (**www.mdd.maharashtra.gov.in**) या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(शासन निर्णय क्र. अविवि-२००९/प्र.क्र.२१३/०९/का.७ दि.३१, ऑगस्ट,२००९ आणि दि.८ जानेवारी, २०१० महाराष्ट्र शासनाच्या** www.mdd.maharashtra.gov.in **या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे).**

--------------



# योजना क्र.२

## राज्यातील अल्पसंख्याक समाजातील प्राथमिक शाळेत शिक्षण घेणा-या विद्यार्थ्यांसाठी मोफत गणवेश वाटप योजना.

### उद्देश

महाराष्ट्र राज्यातील अल्पसंख्याक (मुस्लिम, बौध्द, शीख, ख्रिश्चन, जैन व पारसी) समाजातील शैक्षणिक मागासलेपणा दूर करण्यासाठी शासनामार्फत राज्यातील शासनमान्य सर्व अनुदानित / विनाअनुदानित प्राथमिक शाळेतील (इंग्रजी माध्यमातील कायम विना अनुदानित शाळा वगळून) अल्पसंख्याक विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत वाढ होण्यासाठी, गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी व विद्यार्थ्यांना शाळेत उपस्थित राहण्यास उत्साह निर्माण करण्यासाठी मोफत गणवेश योजना सुरु करण्यात आली आहे.

### योजनेचे स्वरुप कार्यक्षेत्र व पात्र अर्जदार

या योजने अंतर्गत प्राथमिक शाळेतील इयत्ता १ ली ते ४ थी मध्ये शिक्षण घेत असलेल्या अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांसाठी (मुलां/मुलींना) प्रत्येक वर्षासाठी गणवेषाची एक जोडी (२ शर्ट, हाफ पँट/२ स्कर्ट, ब्लाऊज/२ सलवार, २ कमीज, २ दुपट्टा) मोफत वाटप करण्याच्या योजनेस राज्य शासनाने मान्यता दिली आहे.

या योजनेनुसार प्राथमिक शाळेतील (इयत्ता १ ली ते ४ थी) अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना शासनाच्या सध्या अस्तित्वात असलेल्या इतर योजनेनुसार गणवेश वांटप होत असल्यास अशा विद्यार्थ्यांस दुहेरी गणवेश वाटप होणार नाही.

सन २००९-१० पासून राज्यातील शासनमान्य सर्व शासकीय/खाजगी अनुदानित व विनाअनुदानित प्राथमिक शाळेतील (इंग्रजी माध्यमातील कायम विना अनुदानित शाळा वगळून) इयत्ता १ ली ते ४थी मध्ये शिकत असलेल्या सर्व अल्पसंख्याक समाजातील विद्यार्थ्यांना (मुले व मुली) सदर योजना लागू करण्यात आली आहे.

या योजनेंतर्गत प्रती विद्यार्थी मंजूर करावयाच्या कापडाचे प्रमाण खालीलप्रमाणे आहे.-

**मुलांसाठी (प्रत्येकी २ नग शर्ट आणि २ नग हाफ पँट)**

| इयत्ता | वयोगट वर्ष | हाफपँटसाठी लागणारे कापड (मीटर) | शर्टसाठी लागणारे कापड (मीटर) |
|---|---|---|---|
| १ ली | ५ ते ६ | ०.४४ | ०.७२ |
| २ री | ६ ते ७ | ०.४९ | ०.७८ |
| ३ री | ७ ते ८ | ०.५५ | ०.९ |
| ४ थी | ८ ते ९ | ०.६६ | १.०५ |

मुलींसाठी (स्कर्ट/ ब्लाऊज)

| इयत्ता | वयोगट वर्ष | स्कर्टसाठी लागणारे कापड (मीटर) | ब्लाऊज साठी लागणारे कापड (मीटर) |
|---|---|---|---|
| १ ली | ५ ते ६ | ०.६६ | ०.६४ |
| २ री | ६ ते ७ | ०.६८ | ०.६७ |
| ३ री | ७ ते ८ | ०.७४ | ०.७ |
| ४ थी | ८ ते ९ | ०.७७ | ०.७४ |

मुलींसाठी (सलवार/कमीज/दुपट्टा)

| इयत्ता | वयोगट वर्ष | सलवार साठी लागणारे कापड (मीटर) | ब्लाऊज साठी लागणारे कापड (मीटर) | सलवार साठी लागणारे कापड (मीटर) |
|---|---|---|---|---|
| १ ली | ५ ते ६ | १.०० | १.२५ | २.० |
| २ री | ६ ते ७ | १.१० | १.३५ | १.०० |
| ३ री | ७ ते ८ | १.२० | १.४५ | १.०० |
| ४ थी | ८ ते ९ | १.३० | १.५५ | १.०० |

### योजनेची अंमलबजावणी

या योजनेच्या अंमलबजावणी चे काम शिक्षण संचालक, (अल्पसंख्याक व प्रौढ शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे हे पाहणार आहेत.योजनेंतर्गत पात्र विद्यार्थ्यांची माहिती संबंधित शाळांचे मुख्याध्यापक संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद शिक्षण निरिक्षक, महानगरपालिका / उप शिक्षणाधिकारी नगरपालिका यांचेकडे सादर करतील व शालेय शिक्षण विभागाच्या धोरणानुसार गणवेशाचा पुरवठा करण्यात येईल.

### योजनेची अधिक माहिती

योजनेची अधिक माहिती संबंधित शाळांचे मुख्याध्यापक अथवा गट शिक्षणाधिकारी, (पंचायत समिती), शिक्षण निरिक्षक, महानगरपालिका / उप शिक्षणाधिकारी, नगरपालिका, शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच अल्पसंख्याक विकास विभागाच्या www.mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**(शासन निर्णय क्र. असंस-२००९/प्र.क्र.३६/का.१ दि. २४ फेब्रुवारी,२००९, दि.१६ सप्टेंबर, २००९, दि.१३.१.२०१० महाराष्ट्र शासनाच्या www.mdd.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला आहे).**

-------------



# योजना क्र.३

## अल्पसंख्याकबहुल शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अनुदान योजना.

---

### उद्देश

महाराष्ट्र शासनाने राज्यामधील अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्राबल्य असलेल्या राज्यातील शासन मान्यताप्राप्त अनुदानित / विनाअनुदानित शाळांना पायाभूत सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अनुदान योजना कार्यान्वित केली आहे.

### योजनेचे स्वरुप कार्यक्षेत्र व पात्र अर्जदार

अल्पसंख्याक विद्यार्थ्यांचे प्राबल्य असलेल्या राज्यातील शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा उपलब्ध करुन देऊन शिक्षणाचा गुणात्मक दर्जा उंचावण्यासाठी, ज्या शासन मान्यताप्राप्त अनुदानित/ विनाअनुदानित शाळांमध्ये किमान ७०% अल्पसंख्याक विद्यार्थी **(मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, बौद्ध, झोराष्ट्रीयन (पारसी व जैन)** शिक्षण घेत आहेत, अशा शाळांमध्ये पायाभूत सोयी-सुविधा निर्माण करण्यासाठी राज्य शासन कमाल रु.२ लाख एवढया रकमेच्या मर्यादेपर्यंत अनुदान उपलब्ध करुन देईल.

**या मूलभूत / पायाभूत सोयी-सुविधांमध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव असेल :-**

१) शाळेच्या इमारतींचे नुतनीकरण व डागडुजी,

२) पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था करणे,

३) ग्रंथालय अद्ययावत करणे,

४) प्रयोगशाळा अद्ययावत करणे,

५) संगणक कक्ष अद्ययावत करणे,

६) प्रसाधनगृहे / स्वच्छतागृहे उभारणे / डागडुजी करणे.

### अर्ज करण्याची पध्दत

१) या योजनेच्या विस्तृत प्रसिध्दीसाठी संबंधित जिल्हाधिका-यांतर्फे तीन स्थानिक व प्रमुख वृत्तपत्रात जाहिरात देण्यात येईल. या योजनेंतर्गत अनुदान मिळण्यास इच्छुक असलेल्या व शासन निर्णयातील अटी व शर्तींची पूर्तता करणा-या शाळांनी सोबतच्या परिशिष्ट-अ मध्ये दर्शविलेल्या अर्जाच्या नमून्यात संबंधित जिल्हाधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करणे आवश्यक आहे. संबंधित जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय निवड समिती विहित निकषांनुसार प्राप्त अर्जांची छाननी करेल.

संबंधित जिल्ह्यातील जिल्हाधिका-यांच्या अध्यक्षतेखालील ही निवड समिती खालीलप्रमाणे राहील :-

१) जिल्हाधिकारी - अध्यक्ष